नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २४/१०/२०२५ (शुक्रवार )**

## खुनाचा प्रयत्न करणाऱ्या ४ आरोपीतांना केली अटक

**पोलीस स्टेशन कुही** :— पोलीस स्टेशन कुही अंतर्गत मौजा आपतुर येथे १९/१०/२०२५ रोजी फिर्यादी नामे जयश्री जयराम देशमुख,रा. आपतुर ता. उमरेड यांनी तक्रार दिली की, फिर्यादी च्या सासुने आरोपी नामे मंगेश ईश्वर देशमुख, रा.आपतुर ता.उमरेड जिल्हा—नागपुर. याला आमचे घरासमोर ट्रॅक्टर का लावला? असे हटकले असता यातील आरोपी नामे मंगेश याने फिर्यादीच्या सासुला मारहाण केली होती. त्यामुळे फिर्यादीचे पती जयराम देशमुख यांनी माझ्या आईला का मारहाण केली ? अशी विचारना केली असता आरोपी नामे १) मंगेश ईश्वर देशमुख वय ४५ वर्ष , २) भुषण मंगेश देशमुख, वय २१ वर्ष, ३) आदित्य मंगेश देशमुख वय १९ वर्ष ४) ईश्वर महादेव देशमुख वय ७७ वर्ष आणि ५) महीला आरोपी यांनी फिर्यादी व फिर्यादी हीचे घरचे लोकांसोबत भांडण करून वाद केला व अंगावर धावुन येवुन हातबुक्याने मारहाण केली. तसेच आरोपी नामे भुषण मंगेश देशमुख याने फिर्यादीच्या पतीला लोखंडी छन्नीने मारहाण करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी फिर्यादीचा मुलगाा हा भांडण सोडवण्याकरीता गेला असता त्याला देखील आरोपी यांनी काठीने मारहाण केली. सदर प्रकरणी फिर्यादीच्या रिपोर्ट वरून कलम ११८(१), ३५२, ३(५), भा. न्या. सं. २०२३ अन्वये गुन्हा नोंदविणत आला आहे.

सदर गुन्हयातील जखमी यांचा नागपुर मेडीकल कॉलेज येथे उपचारा सुरू असतांना वैद्यकीय अधिकारी यांचे स्पष्ट अभिप्राय प्राप्त झाल्याने व जखमीचे बयान नोंदविल्यानंतर सदर गुन्हयात कलम ११८(२),१९१(२), १९१(३), १९० भा.न्या.स. २०२३ वाढ केली

तसेच आज रोजी सदर गुन्हयात कलम १०९(१) (खुनाचा प्रयत्न) भा.न्या.स.२०२३ अन्वये कलम वाढ केली आहे. नमुद प्रकरणी आरोपी १) भुषण मंगेश देशमुख वय २१ वर्ष ,२) आदित्य मंगेश देशमुख वय १९ वर्ष ३) मंगेश ईश्वर देशमुख वय ५० वर्ष ४) ईश्वर महादेव देशमुख वय ७७ वर्ष, यांना दि.२१/१०/२०२५ रोजी अटक करण्यात आली आहे. नमुद चारही आरोपी न्यायालयीन कोठडीत असुन सदर गुन्हयाचा तपास कुही पोलीस करीत आहेत.

## अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या अरोपीविरूध्द गुन्हा नोंद एम.आय.डी.सी बोरी पोलीसांची कामगिरी

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :— दिनांक २३/१०/२०२५ रोजी एम.आय.डी.सी. बोरी पोलीसांना गोपनिय माहीती मिळाली की, मौजा वटेघाट येथे राहणारा इसम नामे अजमत जुबेर खान हा त्याच्या रहाते भागात तलवार घेवुन फिरत आहे. त्यामुळे नागरिकांच्या मनात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहीतीन्वये पोलीसांनी तात्काळ पंचासह मौजा वटेघाट येथे जावुन अजमत जुबेर खान, वय २७ वर्ष, रा. वार्ड क्र ०२ वटेघाट, तह. हिंगणा याला विचारपुस करून त्याचे ताब्यातुन एक स्टीलची धारदार तलवार जप्त करण्यात आली.

**नमुद आरोपी विरूद्ध पोस्टे एमआयडीसी बोरी येथे कलम ४/२५ शस्त्र अधिनियम सह कलम १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियमअन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.**

## अवैधरित्या देशीदारू,मोहाफुल दारू बाळगणाऱ्या/विक्री तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांवर,नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई, ९ गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक २३/१०/२०२५ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या देशीदारू, मोहाफुल दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू एकुण किंमती ३,८७०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी जुगलकिशोर रामदासजी जैस्वाल, वय ४८ वर्ष रा, खैरगाव ,ता नरखेड, २. सौरभ रंजनसिंग गायधने, वय २७ वर्ष, रा. मसोरा, ता. नरखेड , ३. संजय सूधाकर बावने, वय ४१ वर्ष, रा, बेलोना, ता. नरखेड, ४.नामदेव रामराव पाचोडे, वय ४१ वर्ष, रा. तिनखेडा, ता नरखेड, यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन केळवद येथे** आरोपी नामे जितेंद्र ज्ञानेश्वर कोल्हे, वय ३४ वर्ष, रा.नांदागोमुख, ता. सावनेर आणि २ महीला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे, **पोलीस स्टेशन खापा** आरोपी नामे विजय चंद्रभान खंडाते ,वय ३२ वर्ष, रा. कोरमेटा ता. सावनेर जि. नागपूर आणि अंकुश गोमाजी परतेती, वय ३४ वर्ष, रा. कोरमेटा, ता. सावनेर जि. नागपूर यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. अशा ९ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ९ गुन्हे दाखल केले आहे.

## सायबर सुरक्षा जनजागृती महिना – ऑक्टोबर २०२५ अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात येत आहे सायबर सुरक्षा जनजागृती मोहीम

नागपुर ग्रामीण जिल्हयात **सायबर सुरक्षा जनजागृती महिना – ऑक्टोबर २०२५ अंतर्गत** मा. श्री. हर्ष ए पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सायबर सुरक्षा जनजागृती मोहीमेअंतर्गत खालील प्रमाणे खालील प्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले.

दिनांक २४/१०/२०२५ रोजी **पोलीस स्टेशन उमरेड** अंतर्गत सहा पोलीस निरीक्षक श्रीमती भाग्यश्री कुलकर्णी, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन उमरेड यांनी कुंभारी येथील ॲपेक्स कंपनीतील कामगारांना आणि ईतर स्टाफ यांना सायबर सुरक्षे बाबत माहीती देवुन जनजागृती केली.

**नागपुर ग्रामीण पोलीस दलातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की,**

**१. ऑनलाईन फ्री गिफ्ट किंवा कुपन्स साठी येणाऱ्या लिंक वर पडताळणी करूनच क्लिक नका. तुमचा मोबाईल हॅक होवुन डेटा चोरी होवु शकतो. संशयीत मोबाईल क्रमांक, इमेल, मेसेज आणि लिंक्स बाबत**

**www.cybercrime.gov.in या संकतेस्थळावर रिपोर्ट करा. तसेच सायबर गुन्हयांची तक्रार नोंदविण्यासाठी www.cybercrime.gov.in या संकतेस्थळावर किंवा हेल्पलाईन क्रमांक 1930 , 1945 यावर तक्रार नोंदवा.**




## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक २३/१०/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक २४/१०/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्रीमती वृष्टि जैन, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड विभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत उमरेड शहरात मंगळवारी पेठ, इतवारी पेठ येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कोबिंग ऑपरेशन श्रीमती वृष्टी जैन यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती

घेण्यात आली. बायपास चौक येथे नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये उमरेड पोलीस स्टेशन सह दंगा नियत्रंण पथकाचे अंमलदार हजर होते.




मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने